मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, अकोला
R.D.G. कॉलेज समोर, मुर्तिजापुर रोड, अकोला-444001 akola.diu.smart@gmail.com

दिनांक :- 4 / 9 /2025

जा.क्र./स्मार्ट/ प्रमुख, जि. अं. कक्ष स्मार्ट, अकोला /ऑडीट पॅरा/ 270 /2025

प्रति,

**एस. रामानंद अय्यर अॅन्ड को.,**

**चार्टड अकाऊंटन्ट, अंधेरी मुंबई**

विषय:- कॉटन पिकींग बॅग च्या देयका संबंधीत मुद्दा क्र.1 चा ऑडीट पॅरा निरस्त करणे बाबत.

संदर्भ :- 1) आपला Statutory Audit Report For the Year Ended 31st March 2025 मधील मुद्दा क्र. 1

2) कॉटन पिकींग बॅग या कार्यालयास प्राप्त बाबतची डीलीव्हरी चालान दि. 28/10/2025

3) कॉटन पिकींग बॅग चा नमुना तपासणी करीता पाठविल्याचे पत्र जा.क्र. 518 दि.30/10/2025

4) कार्यालयास मेलव्दारे प्राप्त तपासणी अहवाल दि. 12/11/2024

5) मा. प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्मार्ट तथा प्रकल्प संचालक आत्मा,पुणे यांचे प्रकाश अॅग्रोप्लास्ट, नाशिक यांना दिलेले पत्र जा.क्र.1214 दि. 12/6/2025

6) या कार्यालयाचे प्रकाश अॅग्रोप्लास्ट, नाशिक यांना कॉटन पिकींग बॅग हया तांत्रिक विनिर्देशानुसार नसल्याने कार्यालयातुन उचल करणे बाबतचे पत्र जा.क्र. 541 दि.14/11/2025

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मा बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन स्मार्ट प्रकल्पा अंतर्गत असलेल्या स्मार्ट कॉटन उपप्रकल्पामध्ये प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, पुणे कार्यालया मार्फत निविदा प्रक्रीया राबवुन खरेदी करण्यात आलेल्या कॉटन पिकींग बॅग हया या कार्यालयास संदर्भ क्र. 2 नुसार दि.11/10/2025 रोजी प्राप्त झाल्या. संदर्भ क्र. 3 नुसार सदर कॉटन पिकींग बॅग चा नमुना ICAR, Mumbai येथे पाठविण्यात आला आहे. संदर्भ क्र. 4 नुसार या कार्यालयास तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे. संदर्भ क्र. 5 नुसार मा. प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्मार्ट तथा प्रकल्प संचालक आत्मा, पुणे यांचे मार्फत प्रकाश अॅग्रोप्लास्ट, नाशिक यांना पत्रान्वये कळविले आहे की, तांत्रीक विर्निदेशानुसार साहीत्याचा पुरवठा झालेला नसल्याने करारातील अटी व शर्तीचा भंग झाला असल्याने कॉटन पिकींग बॅगची उचल करण्यात यावी. तसेच मुद्देमालाच्या देयकाची अदायगी संदर्भात या कार्यालयाची कोणतीही जबाबदारी असणार नाही याबाबत सुध्दा सुचित केले होते. संदर्भ क्र. 5 ला अनुसरुन संदर्भ क्र. 6 नुसार प्रकाश अॅग्रोप्लास्ट, नाशिक यांना कळविले आहे की, सदर मुद्देमालाच्या देयकाची अदायगी संदर्भात या कार्यालयाची कोणतीही जबाबदारी असणार नाही याची सूचना आपणास या पत्राव्दारे देण्यात येत आहे. **यानंतर होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस किंवा हानीस आपण स्वत: जबाबदार असाल याची कृपया नोंद घ्यावी.त्या अनुषंगाने प्रकाश अॅग्रोप्लास्ट, नाशिक यांचे कडुन डिलेव्हरी चालान शिवाय निविदा करारानुसार कोणतेही कागदपत्रे या कार्यालयास प्राप्त झाले नसल्याने देयक अदायगी ची कार्यवाही या कार्यालया मार्फत करण्यात आलेली नसल्याने,** विषयांकीत पॅरा हा निरस्त करण्यात यावा ही विनंती.

Jadhav

(मोहिनी जाधव)
नोडल अधिकारी
जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, अकोला

प्रत :- मा. नोडल अधिकारी, विभागीय अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, अमरावती यांना माहितीस्तव सविनय सादर.

— स्वा। —

(मोहिनी जाधव)
नोडल अधिकारी
जिल्हा अंमलबजावणी कक्ष स्मार्ट, अकोला